जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

4 JUN 2019

लोकसत्ता

# डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा डॉ. शिंदे यांच्याकडे अतिरिक्त पदभार

प्रतिनिधी, कोल्हापूर

**डॉ. बाबासाहेब** आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा अतिरिक्त पदभार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. या विद्यापीठाचे कुलगुरू बी. ए. चोपडे यांचा कार्यकाल संपल्याने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सोमवारी येथे सांगण्यात आले.

डॉ. शिंदे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केमिकल टेक्नोलॉजी विभागाचे प्रमुख होते. यानंतर त्यांची निवड कोल्हापुरातील विद्यापीठाच्या कुलगुरूपदी झाली. येथे काम करतांना शिंदे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदावर काम केले आहे. कोल्हापूर, पुणे, मुंबई आणि आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद असा त्यांचा प्रवास आहे. आता ते त्यांच्याच विद्यापीठात कुलगुरु म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. 'ज्या विद्यापीठात शिकलो, नोकरी केली, विविध अधिकार मंडळावर काम केले, त्याच मातृसंस्था असलेल्या विद्यापीठाच्या अतिउच्च पदावर काम करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे', अशी प्रतिक्रिया शिंदे यांनी व्यक्त केली.

# ‘औरंगाबाद’चा कार्यभार डॉ. शिंदेंकडे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. डॉ. शिंदे मंगळवारी (ता. ४) कार्यभार स्वीकारतील.

डॉ. देवानंद शिंदे यांनी यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ या विद्यापीठांचा कार्यभार सांभाळला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने डॉ. शिंदे यांच्याकडे तेथील प्रभारी कार्यभार सोपविण्यात आला.

पुढारी

# कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे 'औरंगाबाद'चा अतिरिक्त कार्यभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त प्रभारी कार्यभार सोपविण्यात आला आहे. याबाबतचे आदेश कुलपती कार्यालयाकडून सोमवारी प्राप्त झाले आहेत. कुलगुरू डॉ. शिंदे मंगळवार (दि. ४ जून) कार्यभार स्वीकारणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या कार्यकाळात डॉ. शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे तिसरे विद्यापीठ आहे. यापूर्वी त्यांनी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांच्या प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभारही सांभाळला आहे.

औरंगाबाद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. ए. चोपडे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने पुढील आदेश होईपर्यंत डॉ. शिंदे यांच्याकडे प्रभारी कार्यभार असणार आहे.



> ज्या मातृसंस्थेत मी शिकलो, जिथे वाढलो, जिच्या बळावर कुलगुरूपदापर्यंत मजल मारू शकलो, त्या मातृसंस्थेच्या कुलगुरूपदी काम करण्याची संधी कुलपती सी. विद्यासागर राव यांनी दिली. हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. फुले-शाहू-आंबेडकर या त्रयींच्या कर्मभूमीमध्ये काम करण्याची संधी मला मिळाली.
>
> - **डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# कुलगुरू डॉ. शिंदेंवर औरंगाबाद विद्यापीठाचा अतिरिक्त कार्यभार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त प्रभारी कार्यभार सोपविण्यात येत असल्याचा आदेश कुलपती कार्यालयाकडून सोमवारी प्राप्त झाला. कुलगुरू डॉ. शिंदे मंगळवार, दि. ४ जून रोजी कार्यभार स्वीकारणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाच्या कार्यकाळात डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे तिसरे विद्यापीठ आहे. यापूर्वी त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांच्या प्रभारी कुलगुरूपदाचा कार्यभारही सांभाळला आहे. याबाबत कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ज्या मातृसंस्थेत मी शिकलो, जिथे वाढलो, जिच्या बळावर कुलगुरू पदापर्यंत मजल मारू शकलो, त्या मातृसंस्थेच्या कुलगुरूपदी काम करण्याची संधी कुलपतींनी दिली, ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 JUN 2019

तरुण भारत

# मराठवाडा विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. शिंदे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठ्वाडा विद्यापीठाच्या



कुलगुरू पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. कुलपती कार्यालयाच्या आदेशावरून सोमवारी त्यांनी प्रभारी कुलगुरू पदाचा पदभार स्वीकारला. ज्या विद्यापीठात शिक्षण घेतले त्याच विद्यापीठात आता कुलगुरू होणे म्हणजे एक प्रकारे मोठा गौरवच मानला जात आहे.

औरंगाबाद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने पुढील आदेश होईपर्यंत डॉ. शिंदे यांच्याकडे तेथील प्रभारी कार्यभार देण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या कार्यकाळात डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठ्वाडा विद्यापीठ हे तिसरे विद्यापीठ आहे.

04 JUN 2019

जनप्रवास


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे औरंगाबाद विद्यापिठाचा अतिरिक्त कार्यभार

कोल्हापूर ● प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त प्रभारी कार्यभार सोपविण्यात येत असल्याचा आदेश कुलपती कार्यालयाकडून सोमवारी प्राप्त झाला आहे. कुलगुरू डॉ. शिंदे उद्या (दि. ४ जून) कार्यभार स्विकारतील.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या कार्यकाळात डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे तिसरे विद्यापीठ आहे. यापूर्वी त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांच्या प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार सांभाळला आहे. औरंगाबाद विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने पुढील आदेश होईपर्यंत डॉ. शिंदे यांच्याकडे तेथील प्रभारी कार्यभार असणार आहे.



डॉ. देवानंद शिंदे

या अनुषंगाने प्रतिक्रिया व्यक्त करताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ज्या मातृसंस्थेत मी शिकलो, तिथे वाढलो, जिच्या बळावर कुलगुरू पदापर्यंत मजल मारू शकलो, त्या मातृसंस्थेच्या कुलगुरूपदी काम करण्याची संधी कुलपती चे. विद्यासागर राव यांनी दिली , हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. त्यासाठी कुलपती महोदयांचा मी मनापासून ऋणी आहे. ही संधी मिळण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा मोलाचा वाटा आहे , हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. त्यामुळेच मला अन्यत्रही कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे, या विषयी मी कृतज्ञ आहे. विशेष म्हणजे फुले-शाहू-आंबेडकर या त्रयींच्या कर्मभूमीमध्ये काम करण्याची संधी मला मिळाली. त्यांनी दिलेली समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची पालखी घेऊन ज्ञानमार्गावरून वाटचाल करता येते आहे, याचे मोठे समाधान वाटते, अशी भावना कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.

लोकमत

चार वर्षांचा कार्यकाल पूर्ण : पुणे, मुंबईपाठोपाठ 'मराठवाडा'ची जबाबदारी

# देवानंद शिंदेंकडे तिसऱ्यांदा अतिरिक्त कार्यभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरु पदाचा अतिरिक्त प्रभारी कार्यभार सोपविला आहे. त्याबाबतचा आदेश कुलपती कार्यालयाकडून सोमवारी सकाळी त्यांना मिळाला. यापूर्वी डॉ. शिंदे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु म्हणून काम सांभाळले आहे.

डॉ. शिंदे यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी दि. १६ जून २०१५ रोजी निवड झाली. त्यानंतर पहिल्यांदा दि. १५ मे २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाचा अतिरिक्त आला होता. त्यानंतर ऑगस्टमध्ये त्यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला. आता तिसऱ्यांदा त्यांच्याकडे मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त प्रभारी कार्यभार सोपविला. या विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने डॉ. शिंदे यांच्याकडे प्रभारी कार्यभार असेल.

## समतोल साधण्याची कसरत

उत्तरपत्रिका तपासणीचा मुद्दा तापल्याने त्यावेळी मुंबई विद्यापीठातील कामकाजामध्ये कुलगुरु डॉ. शिंदे यांचा अधिकतर वेळ व्यतीत होऊ लागला. कार्यक्रम, बैठकीपुरतेच शिवाजी विद्यापीठात त्यांचे येणे झाले. त्याचा परिणाम विद्यापीठातील प्रशासकीय कामावर झाला. प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीबाबत विद्यापीठाकडून होणाऱ्या कार्यवाहीची गती मंदावली होती, असा आरोप कोल्हापूरमधील विविध संघटनांनी केला होता; त्यामुळे त्यांच्याकडील अतिरिक्त कार्यभाराबाबत नाराजी व्यक्त झाली होती. डॉ. शिंदे यांच्या कुलगुरुपदाचा चार वर्षांचा कालावधी पुढील आठवड्यात पूर्ण होणार आहे. सप्टेंबरमध्ये शिवाजी विद्यापीठ हे 'नॅक' मूल्यांकनाला सामोरे जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. शिंदे यांना मूळ आणि अतिरिक्त कार्यभार समतोलपणे सांभाळावा लागेल.



"ज्या मातृसंस्थेत मी शिकलो, जिथे वाढलो, जिच्या बळावर कुलगुरुपदापर्यंत मजल मारु शकलो, त्या मातृसंस्थेच्या कुलगुरुपदी काम करण्याची संधी मला मिळाली आहे. माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे; त्यासाठी कुलपती सी. विद्यासागरराव यांचा मी मनापासून ऋणी आहे. ही संधी मिळण्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा मोलाचा वाटा आहे. -डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

Kolhapur Main
Page No. 4 Jun 04, 2019
Powered by: erelego.com